**१७२ एस.सी.आर. सर्वोच्च न्यायाल्याचे अहवाल (१९५२)**

**१९५१**

**नोव्हें - २६**

**आदमजी उमर दलाल**

**विरुद्ध**

**दि स्टेट ऑफ बॉम्बे**

**(सय्यद फझल अली, मेहर चंद महाजन आणि विविअन बोस जे.जे.)**

फौजदारी खटला – शिक्षा – दंड आकारणे – मार्गदर्शक तत्वे – आरोपीची परिस्थिती – गुन्हा आणि दंडाचे प्रमाण – तुरुंगवासासह खूप मोठा दंड आकारणे अयोग्य – काळा बाजार – शिक्षा – सर्वोच्च न्यायालय – पद्धत – फौजदारी अपील – शिक्षेत हस्तक्षेप.

शिक्षेच्या योग्य प्रमाणाचे निर्धारण करणे नेहमीच मोठ्या अडचणीचा मुद्दा असतो आणि त्याबाबत कोणताही ठोस नियम निर्धारित केला जाऊ शकत नाही, हा विवेक बुद्धीचा विषय आहे जो विविध विचारनी मार्गदर्शित केला पाहिजे परंतु न्यायालयाने नेहमीच गुन्हा आणि शिक्षेची प्रमाणशीलता लक्षात ठेवली पाहिजे.

दंड ठोठावताना आरोपी व्यक्तींच्या आर्थिक परिस्थितीचा तितकाच विचार केला पाहिजे जितका गुन्ह्याचे स्वरूप आणि परिणाम याचा विचार करणे

आवश्यक आहे. जेथे जास्त तुरुंगवासाची शिक्षा दिली जाते तिथे अपवादात्मक प्रकरणे वगळता सोबत जास्तीचा दंड आकारला जाऊ नये. जरी सध्य परिस्थितीत ह्या देशात काळा बाजाराचा गुन्हा अतिशय जोमाने चालू आहे आणि जेव्हा तो एखाद्या व्यक्ती विरुद्ध शाबित केला जातो तेंव्हा शिक्षेच्या बाबतीत कोणती नरमाई दाखविली जाऊ नये. काही प्रमाणात तीव्र शिक्षा ही खूप योग्य असू शकते आणि तश्या शिक्षेची मागणी देखील केली जाऊ शकते तरीही जेंव्हा मोठ्या कारावासाची शिक्षा विशेषतः एखाद्या अडत्याला देण्यात आली असेल तर त्यावर अनावश्यक भारी दंड बसवणे, जे त्या अडत्याच्या संदर्भातील मुख्याच्या बाबतीत काही प्रमाणात न्याय असू शकेल, योग्य नाही.

घडलेल्या गुन्ह्यासाठी ठोठावण्यात आलेल्या शिक्षेच्या बाबतीत विशेष परवानगी अर्जाद्वारे हस्तक्षेप करणे ही सर्वोच्च न्यायालयाची प्रथा नाही, जेथे अनावश्यक कठोर आणि न्यायाच्या उदिष्ठाना खरोखरी पुढे न नेणारी शिक्षा दिली जाते अशी अपवादात्मक प्रकरणे वगळता ! (ह्या प्रकरणामध्ये न्यायालयाने लादलेले दंड खूप जबरदस्त आणि गुन्ह्यच्या स्वरूपाशी विषम होते ह्या कारणावरून हस्तक्षेप केला आणि शिक्षेत कपात केली).

फौजदारी अपील न्यायाधिकर : फौजदारी अपील क्रमांक ५४ आणि ५५ ऑफ १९५१. मुंबई उच्च न्यायालय (बावडेकर आणि चैनानी जे.जे.) यांचे दिनांक ११ एप्रिल १९५१ चे फौजदारी अपील क्रमांक ८८ व ८९ ऑफ १९५१ मधील न्यायनिर्णय व आदेशाविरुद्ध.

*एच-जे. उम्रीगर – अपिलकर्ता यांचेकरिता*

*जिंद्र लाल – उत्तरवादी यांचेकरिता*

२६ नोव्हेंबर १९५१ रोजी न्यायालयाचा न्यायनिर्णय दिला :

महाजन जे. – ही दोन अपिले विशेष परवानगीने दाखल करणेत आलेली असून ती अपिले केवळ फक्त आरोपीस सुनावण्यात आलेल्या शिक्षेबद्दल सीमित करणेत आलेली आहेत. अपिलकार आदमजी उमर दलाल ह्या विरुद्ध इतर पाच आरोपी लोकांसोबत फौजदारी केस क्रमांक १७८३/P ऑफ १९५०, ज्यापासून फौजदारी अपील क्रमांक ५४/१९५१ निर्माण झाले, खालील आरोपांवरून खटला चालला.

प्रथमतः तुम्ही मुंबई येथे दिनांक २९ डिसेंबर १९४९ रोजी किंवा त्या सुमारास जीवनावश्यक वस्तू (अस्थायी अधिकार) कायदा १९४६ खाली निर्गमित केलेल्या शासकीय अधिसूचना क्रमांक ३४२/IV B दिनांक २७/०१/१९४६ चा भंग करून ५० पिंप केरोसीन ओईल, त्या संबंधीची कोणताही वैध परवाना नसताना सदरचे पिंपातील पदार्थ अतिवेगवान डीझेल तेल असल्याचे चुकीचे वर्णन करून किंवा चुकीचे वर्णन करण्याचा प्रयत्न करून रेल्वेने मुंबई राज्याबाहेर जालना येथे निर्यात करायचा प्रयत्न केला आणि त्याद्वारे जीवनावश्यक वस्तू (अस्थायी अधिकार) कायद्याचे कलम ७ व ८ खाली गुन्हा केला.

तसेच तुम्ही मुंबई येथे दिनांक २९ डिसेंबर १९४९ किंवा त्या सुमारास ५० पिंप केरोसीन ओईल हायस्पीड डीझेल तेल असे चुकीचे वर्णन करून किंवा चुकीचे वर्णन करायचा प्रयत्न करून राज्याबाहेर निर्यात करायचा प्रयत्न केला आणि तो गुन्हा करण्यास एकमेकांना मदत केली आणि त्याद्वारे भारतीय रेल्वे कायदा चा कलम १०६ आणि १०७ सह भारतीय दंड विधान चा कलम ११४ चा गुन्हा केलेला आहे.

१९५० चा खटला क्रमांक १७८४/P आणि १७८५/P मध्ये अपिलकार त्याचसह आरोपिंबरोबर त्याच आरोपांवरून आरोपी होता फक्त त्यामध्ये ५० पिंप आणि १५ पिंप केरोसीनचे असे लोट्ट होते. त्या दोन केसेसच्या निकालावरून अपील क्रमांक ५५ ऑफ १९५१ दाखल झालेले आहे.

ज्या परीस्थितीत ह्या तीन केसेस उद्भवलेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे आहेत. दिनांक २९/१२/१९४९ रोजी वाडीबंदर रेल्वे स्टेशन वरून ५०, ५० आणि १५ पिपांचे कॉन्सिग्न्मेंटस जालना येथे पाठवणेकरिता नोंदविण्यात आल्या व त्या पिंपात केरोसीन तेल असतानाही उच्चगतीचे डीझेल तेल असल्याचे वर्णन दिले गेले. पोलिसांना ह्याची माहिती मिळताच त्यांनी रेल्वेच्या वाघिणी उघडल्या आणि त्यात ठेवलेली पिंपे ताब्यात घेतली. आरोपी नंबर २, ३ व ४ हे आडत्यांच्या भागीदारी संस्थेचे सदस्य आहेत. त्यांनी तीन वेग-वेगळ्या मुख्य व्यापार्यांकरिता सनबीम ओईल कंपनी कडून तेलाची पिंपे विकत घेतलेली होती. आरोपी नंबर १ ह्या अशा कमिशन एजंटच्या फर्मचा प्रतिनिधी आहे. आरोपी नंबर ५ आणि ६ हे अनुक्रमे पुरवठा करणाऱ्या कंपनीच्या गोदामाचे रक्षक आणि सहरक्षक आहेत. जप्त करण्यात आलेल्या सर्व

पिंपानवर “प्रकाश ट्रेडर्स- हाय स्पीड डीझेल ओईल, USA” असे लिहलेले होते. आरोपी क्रमांक ३ ने दोन लोरीज, १०० पिंपे नेण्याकरिता भाड्याने घेऊन त्यात ते पिंपे भरली आणि ती पिंपे साक्षदर सत्तार लतीफ की जो वाडीबंदर येथे फॉरवरडिंग आणि कारटिंग एजंट होता त्याच्याकडे नेऊन दिली. आरोपी क्रमांक ३ ने साक्षदार सत्तार लतीफ यास ही पिंपे हैदराबाद राज्यातील जालना येथे पाठवण्याच्या सूचना दिल्या. आरोपी क्रमांक १ करिता विकात घेतलेल्या ५० पिपंच्या संदर्भातील माल पाठवण्याच्या रसीदीमध्ये माल पाठवनाऱ्याछे नाव म्हणून त्याच्या फर्म चे नाव आणि माल घेणाऱ्याचे नाव म्हणून त्याचे स्वतःचे नाव लिहलेले होते आणि त्या रसीदीवर सत्तार लतीफने सही केलेली होती. त्या द्स्त ऐवाजावर मालाचे वर्णन हायस्पीड डीझेल ओईल असे दिलेले होते. इतर दोन  कॉन्सिग्न्मेंट बद्दल देखील तशाच प्रकारच्या कॉन्सिग्न्मेंटस नोद्व तयार करणेत आलेल्या होत्या. मुंबई राज्याच्या बाहेर कोणत्याही ठिकाणी केरोसीन तेल निर्यात करण्यास बंदी होती त्या सर्व पिंपानवर पंधरा रंग लावलेला होता आणि त्या पांढरया रंगा खाली केरोसीन तेल असे लिहलेले स्पष्टपणे दिसत होते. अशा वास्तविकतेवरून अभियोग पक्षाने ५०, ५० आणि १५ पिम्पांच्या ३ कॉन्सिग्न्मेंटस करिता तीन वेगळेवेगळे खटले एकूण सहा आरोपींविरुद्ध वर नमूद केलेल्या आरोपांखाली दाखल केले. सर्व आरोपींनी आरोप नाकबूल केले.

आरोपी क्रमांक ५ याने असे म्हणणे मांडले की, आरोपी क्रमांक २ व ३ यांनी त्याचाकडे हायस्पीड डीझेल ओईल देण्याकरिता डीलीव्हरी ऑर्डर दिली पण त्याने त्यांच्या विनंतीवरून आरोपी नंबर २ व ३ यांना केरोसीन तेल दिले. आरोपी क्रमांक १ ने

त्याच्या फर्म करिता एकूण ६५ पिम्पांच्या हायस्पीड डीझेल ओईल्ची ऑर्डर आरोपी क्रमांक २ मार्फत दिल्याचे कबूल केले परंतु त्याऐवजी केरोसीन तेलाची डीलीव्हरी दिल्याची माहिती त्याने नाकारली. आरोपी क्रमांक २ याने असे म्हणणे मांडले की, त्याने सनबीम ओईल कंपनी कडे हायस्पीड डीझेल ओइल्च्या ६५ पिम्पांची ऑर्डर दिली आणि कंपनी कडून डीलीव्हरी ऑर्डर घेतली व ती डीलीव्हरी ऑर्डर त्याने आरोपी क्रमांक ३ ला दिली व कंपनीच्या गोदामामधून डीलीव्हरी घेण्याकरिता त्याच गोदामाकडे पाठविले. त्याने आरोपी क्रमांक ५ ला डीझेल ओईल ऐवजी केरोसीन तेल देण्यास सांगितल्याची बाब नाकारली. आरोपी क्रमांक ३ ने आरोपी क्रमांक २ च्या सुचनेनुसार पिम्पांची डीलीव्हरी घेतल्याचे आणि २ ट्रक भरून वाडीबंदर स्टेशनला पाठविल्याचे कबूल केले परंतु त्या पिम्पांमध्ये केरोसीन असल्याचे कळल्यानंतर त्यास आश्चर्य वाटले अस त्याने सांगितले. त्याने हे नाकबूल केले की त्याने कधीही कंपनी ला डीझेल ओईल ऐव्जी केरोसीन तेल देण्यास सांगितले. आरोपी क्रमांक ४ ने त्या संपूर्ण व्यवहारात स्वतः काहीही सहभाग घेतलेला नसून त्यांना कोणताही गुन्हा केलेला नाही असे म्हणणे मांडले. आरोपी क्रमांक ६ ने असे म्हणणे मांडले की, त्याने आरोपी क्रमांक ५ ने ऑर्डर केल्याप्रमाणे पिम्पांचा पुरवठा केला आणि त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नाही. विद्वान प्रेसिडेनसी न्यायदंडाधिकारी यांनी आरोपी क्रमांक २, ३ आणि ५ यांना लावलेल्या आरोपाखाली दोषी ठरविले आणि आरोप क्रमांक १, ४ आणि ६ यांना संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्त केले.

या दोन अपिलातील अपिलकर (आरोपी क्रमांक ३) यास खालीलप्रमाणे शिक्षा देण्यात आली.

1) केस नंबर 1783-P ऑफ १९५० मध्ये त्याला जीवनावश्यक वस्तू (अस्थायी अधिकार) कायदा १९४६ च्या कलम ७ आणि ८ च्या गुन्ह्याकरिता ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा आणि १५,००० रुपये दंड आणि दंड न दिलेस ६ महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा तसेच भारतीय रेल्वे कायद्याचा कलम १०६ अन्वये रुपये १,००० दंडाची शिक्षा आणि दंड न भरल्यास १ महिना कैदेचे शिक्षा.

2) केस नंबर १७८४- P ऑफ १९५० मध्ये मध्ये त्याला जीवनावश्यक वस्तू (अस्थायी अधिकार) कायदा १९४६ च्या कलम ७ आणि ८ च्या गुन्ह्याकरिता त्याला ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा आणि १५,००० रुपये दंड आणि दंड न दिलेस ६ महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा तसेच भारतीय रेल्वे कायद्याचा कलम १०६ अन्वये रुपये १,००० दंडाची शिक्षा आणि दंड न भरल्यास १ महिना कैदेचे शिक्षा.

3) केस नंबर १७८५ - P ऑफ १९५० मध्ये मध्ये त्याला जीवनावश्यक वस्तू (अस्थायी अधिकार) कायदा १९४६ च्या कलम ७ आणि ८ खाली एक दिवसाची कैद आणि रक्कम रुपये १०,००० दंड आणि दंड न भरलेस ६ महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा तसेच भारतीय रेल्वे कायदा खाली त्याला

रुपये ३०० दंडाची शिक्षा आणि दंड न भरलेस एक महिन्याची कैद्याची शिक्षा अशी शिक्षा ठोठोवण्यात आली. परिणामतः ११५ तेलांच्या पिम्पांकरिता कैदेच्या शिक्षे शिवाय एकूण ४२,३०० रुपयांचा दंड अपिलकर आरोपीवर बसविणेत आला होता. विद्वान प्रेसिदेन्सी न्यायदंडाधिकारी यांनी शिक्षा ठोठावताना असे म्हटले होते की,

**" ज्यावेळेला असे काळ्याबाजाराचे व्यवहार उघडकीस येतात त्यावेळेला ते ठेचून टाकले पाहिजेत अन्यथा या महामारीपासून सामान्य माणसाला सुटका मिळणार नाही ".**

अपिलामध्ये दोष्सिधी व शिक्षा दोन्ही कायम ठेवण्यात आल्या फक्त पाचव्या आरोपीवर बसवण्यात आलेला दंड रद्द करणेत आला. उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, ज्या पद्धतीने गुन्हा करणेत आलेला होता आणि ज्या उद्देशाने केरोसीन मुंबई राज्याबाहेर निर्यात करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता त्यावरून हे स्पष्ट होते की त्याचा काळा बाजार करण्याचा उद्देश होता त्यामुळे ह्यावरून दिलेली शिक्षा ही कठोर आहे असे म्हणता येत नाही.

शिक्षेच्या योग्य प्रमाणाचे निर्धारण करणे नेहमीच मोठ्या अडचणीचा मुद्दा असतो आणि त्याबाबत कोणताही ठोस नियम निर्धारित केला जाऊ शकत नाही, हा विवेक बुद्धीचा विषय आहे जो विविध विचारनी मार्गदर्शित केला पाहिजे परंतु न्यायालयाने नेहमीच गुन्हा आणि शिक्षेची प्रमाणशीलता लक्षात ठेवली

पाहिजे. दंडाची शिक्षा ठोठोवताना घडलेल्या गुन्ह्याचे स्वरूप आणि त्याच्या प्रकारासोबतच आरोपीची आर्थिक परिस्तिथीचा देखील विचार व्हावयास हवा आणि जेथे जास्तीत जास्त कारावासाची शिक्षा दिली जाते तिथे अपवादात्मक परिस्तिथी वगळता बेसुमार दंड ठोठावला जाऊ नये. आम्हास असे आढळून येते की, या केसेस मध्ये ह्या तत्वांची योग्य दखल घेतली गेलेली नसून काळ्या बाजाराचा दुष्टपणा चिरडून टाकण्याच्या उत्साहाच्या भरात आणि त्या महामारीपासून सामान्य माणसाला स्वतंत्र करण्याच्या उत्साहाने न्यायबुद्धीला शिक्षेचे प्रमाण ठरविण्यामध्ये अस्वस्थ केलेले आहे.

या व्यव्हारनमध्ये अपिलकार आरोपी क्रमांक १ तर्फे आणि इतर मुफ्यानतर्फे अडत्यांच्या भागीदारी फर्मचा सभासद म्हणून भाग घेत होता. आमच्या समोर असे म्हणणे मांडण्यात आले होते की, भागीदारी फर्मचे शुल्क हे विक्रीच्या किमतीच्या अर्धा टक्के एवढे होते. अभिलेखावर आरोपीच्या सांपत्तिक स्तिथी बाबत कोणताही पुरावा नाही. त्याच्या विद्वान वकिलांनी असा जास्त जोर देऊन युक्तिवाद केला की, त्यावर लागलेल्या भरमसाठ दंडाचा अल्पांश देखील भरणे आरोपिकारिता अशक्य आहे. काळ्या बाजारात विकलेल्या तेलातून होणारा नफा हा साधारण व्यापाराच्या पद्धतीतून मुख्य व्यापाऱ्याकडे जातो परंतु तो नफा किती होतो त्याचे प्रमाण काय असते हे माहित नाही किंवा त्याबद्दल अभिलेखावर काही पुरावा नाही. आरोपी क्रमांक १, ज्याला अशा पद्धतीने केरोसीन तेलापासून नफा मिळायचा होता, त्याची निर्दोष सुटका झालेली आहे आणि तो आमच्यासमोर नाही. इतर माणसे ज्यांचाकरिता केरोसीन तेल विकत घेतले गेले होते ह्यांना खटल्यामध्ये सामील करून कोर्टापुढे

आणले गेलेले नव्हते. अशा परिस्तिथीमध्ये अपिलकाराविरुद्ध इतक्या जबरदस्त प्रमाणात दंड बसविण्याकरिता योग्य असे पुरावे अभिलेखावर नाहीत आणि म्हणून तो आमच्या दृष्टीने गुन्ह्याच्या स्वरूपाशी विषम आहे.

हे निसंशय आहे की, ह्या देशात काळा बाजराचा गुन्हा अतिशय जोमाने चालू आहे आणि जेव्हा तो एखाद्या व्यक्ती विरुद्ध शाबित केला जातो तेंव्हा शिक्षेच्या बाबतीत कोणती नरमाई दाखविली जाऊ नये. काही प्रमाणात तीव्र शिक्षा ही खूप योग्य असू शकते आणि तश्या शिक्षेची मागणी देखील केली जाऊ शकते. तथापि, आमच्या मते जेंव्हा अपिलकारावर, जो केवळ अडत्या आहे, कठोर कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आलेली आहे त्यावेळेला फाजील जास्त दंडाची शिक्षा, की जी मुख्य आरोपींच्या बाबतीत काही प्रमाणात योग्य असू शकली असती, ती योग्य नव्हती. घडलेल्या गुन्ह्यासाठी ठोठावण्यात आलेल्या शिक्षेच्या बाबतीत विशेष परवानगी अर्जाद्वारे हस्तक्षेप करणे ही सर्वोच्च न्यायालयाची प्रथा नाही, जेथे अनावश्यक कठोर आणि न्यायाच्या उदिष्ठाना खरोखरी पुढे न नेणारी शिक्षा दिली जाते अशी अपवादात्मक प्रकरणे वगळता.

वर नमूद केलेल्या कारणांकरिता आम्हास असे वाटते की, न्यायदंडाधिकारी यांनी अपिलकारावर बसवलेला आणि उच्च न्यायालयाने कायम केलेला सर्व केसेस मधला दंड जर खालीलप्रमाणे कमी केला तर न्यायची उधिष्टे पूर्ण होतील :-

**केस क्रमांक १७८३-P/१९५० मध्ये दंडाची शिक्षा पंधरा हजारावरून कमी करून एक हजारावर आणणेत येत असून दंड न भरल्यास तो एक महिना कैदेची शिक्षा भोगेल.**

**केस क्रमांक १७८४-P/१९५० मध्ये दंडाची शिक्षा पंधरा हजारावरून कमी करून एक हजारावर आणणेत येत असून दंड न भरल्यास तो एक महिना कैदेची शिक्षा भोगेल.**

**त्याचप्रमाणे केस १७८५-P/१९५० मध्ये दंडाची रक्कम एक हजार पर्यंत कमी करणेत येत असून दंड न भरल्यास तो एक महिना कैदेची शिक्षा भोगेल.**

**ह्या सर्व केसेस मध्ये भारतीय रेल्वे कायद्यानुसार घडलेल्या गुन्हान्करिता दंडाची रक्कम तेविशे ऐवजी एकूण एक हजार फक्त एवढी कमी करणेत येत असून दंड न भरल्यास तो एक महिना कैदेची शिक्षा भोगेल. इतर सर्व बाबींकरिता ही अपिले नामंजूर करणेत येतात आणि खारीज करणेत येतात.**

**शिक्षा कमी करणेत आली**

अपिलकाराकरिता प्रतिनिधी : गणपत राय

उत्तरवादीकरिता प्रतिनिधी : पी. ए. मेहता

# अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x